पोलीस स्टेशन MIDC, मलकापूर



# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** एम.आय.डी.सी.मलकापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0139 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/10/2025 18:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 27/09/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/09/2025
**Time From (वेळेपासून):** 14:48 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/10/2025 **Time (वेळ):** 17:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 027
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/10/2025 17:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पो स्टेएमआयडीसी दसरखेड, मलकापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.भागोजी पदमाकर चोरमले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,बुलढाणा,एम.आय.डी.सी.मलकापूर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,बुलढाणा,एम.आय.डी.सी.मलकापूर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9552520188

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.सतिष रतन वैदकर | | | 1. पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड,,दसरखेड,,मलकापुर, एम.आय.डी.सी.मलकापूर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

लाप्रवि बुलढाणा

कॅम्प पो.स्टे.एमआयडीसी

दसरखेड मलकापुर

दिनांक 09.10.2025

श्री.भागोजी पदमाकर चोरमले, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणा मो.नं. 9552520188

मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा येथे पोलीस उपअधिक्षक म्हणुन माहे जुन/2025 पासुन कार्यरत आहे. दिनांक 27.09.2025 रोजी लाप्रवि कार्यालय बुलढाणा येथे हजर असतांना आम्हास फोनवर मलकापुर येथुन एका ईसमाचा लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने आम्ही आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा आगार यांना पत्र देवुन त्यांच्याकडुन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले त्यानंतर आम्ही, सापळा पथक व पंच असे खाजगी वाहनाने मलकापुर येथे जावुन आम्हास फोन करणा-या ईसमाची भेट घेतली असता त्यांनी त्यांचे नाव श्री.विजय संजय ठाकुर, वय 28 वर्षे, व्यवसाय-अॅटो चालक रा.ज्ञानदेव नगर कावेरी हाॅटेलजवळ, जळगाव ता.जि. जळगाव असे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना आम्हा सापळा पथक तसेच पंचांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार नोंदवुन घेतली पुढीलप्रमाणे,मी विजय संजय ठाकुर, वय 28 वर्षे, रा. ज्ञानदेव नगर, कावेरी हाॅटेलजवळ, जळगाव ता. जि. जळगाव दिनांक 27.09.2025 रोजी आपले समक्ष हजर येवुन तक्रार नोंदवितो की, मार्च 2025 मध्ये जळगाव खान्देश येथील आमीनभाई यांचे कार बाजार येथुन सेकंडहॅन्ड मारुती इको चार चाकी गाडी क्रमांक एमएच 46 एक्स 3120 हि खरेदी केली होती. मी वैयक्तीक कामाकरीता सादीकभाई रा.भुसावळ यांचेकडुन 30000/- रुपये व्याजाने घेतले होते. परंतु काही कारणास्तव त्यांना सदर पैसे परत करणे शक्य न झाल्याने त्यांनी माहे ऑगष्ट 2025 मध्ये माझी वरील गाडी सादीकभाई घेवुन गेले होते. तेव्हापासुन गाडी त्यांच्याकडेच होती. दिनांक 17.09.2025 रोजी सादीकभाई यांचा मलकापुर ते मुक्ताईनगर रोडवरील चिखली रनथम शिवारात अपघात झाला व ते मरण पावले. त्यामुळे सदर गाडी पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड येथे गुन्हयात जमा करण्यात आली होती. त्यासंबधाने दिनाक 18.09.2025 रोजी मला पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड येथे बोलावुन ठाणेदार श्री.कोळी व पोलीस कर्मचारी श्री.सतीष यांनी विचारपुस केली होती. त्यानंतर दिनांक 26.09.2025 रोजी मला गाडीचे मुळ मालक सावदा येथील ईश्वर सोनवणे यांचा फोन आला व त्यांनी सांगीतले की, एमआयडीसी दसरखेड पोलीस स्टेशन येथील कोळी साहेब मला गाडीचा अॅक्सीडेंट झाला असल्याने 50,000/- रुपये मागत आहेत व मी तुला गाडी विकली आहे त्यामुळे गाडीचा व माझा काही संबंध नाही, तु ते बघुन घे असे त्यांनी सांगीतले. त्याच दिवशी पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड जि.बुलढाणा येथुन मोबाईल क्रमांक 9588610834 वरुन पोलीस कर्मचारी श्री.सतीष यांचा फोन आला व त्यांनी मला पोलीस स्टेशनला येवुन भेट, नाही तर तुझ्यावर गुन्हा दाखल

होईल, सर्व गोष्टी फोनवर बोलता येत नाही असे म्हणुन पोलीस स्टेशनला भेटण्यासाठी बोलावले आहे. यापुर्वी दिनांक 18.09.2025 रोजी एमआयडीसी दसरखेड चे ठाणेदार श्री.कोळी व पोलीस कर्मचारी श्री.सतीष यांनी मला बोलावुन सादीकभाई यांचे अपघाताबाबत व माझे गाडीबाबत विचारपुस केलेली होती तरी सुध्दा दि.26.09.2025 रोजी मला फोन करुन पोलीस स्टेशन येथे येण्याचे सांगुन तुझ्यावर गुन्हा दाखल होईल, सर्व गोष्टी फोनवर बोलता येत नाही असे बोलुन भेटण्यासाठी बोलावले. त्यांनी गाडीचे मुळ मालक श्री.ईश्वर सोनवणे यांना 50,000/- रुपये मागीतले होते, परंतु त्यांनी सदर गाडी मला विक्री केलेली असल्याने गाडीमालक म्हणुन एमआयडीसी दसरखेडचे ठाणेदार श्री. कोळी व पोलीस कर्मचारी श्री.सतिष हे मला 50,000/-रुपये लाचेची मागणी करीत आहेत. तरी माझी त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी, अशा आशयाची तक्रार दिलेली होती. सदर तक्रारीवर पंच क्र.1 श्री.कोरडे यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी सहया केल्या व समक्ष म्हणुन आम्ही सुध्दा सही केली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 27.09.2025 रोजी पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेडचे ठाणेदार श्री.कोळी व पोलीस अंमलदार श्री.सतिष यांची पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता पोलीस अंमलदार श्री.सतिष यांनी तक्रारदार यांना पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड हद्दीत झालेल्या अपघाताबाबत गाडी मालक म्हणुन गुन्हा दाखल न करण्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार श्री. विजय ठाकुर यांना एका कागदावर 30000 असे अंकामध्ये लिहुन तक्रारदार यांना दाखविले, त्यावर तक्रारदार लोकसेवक पोलीस अंमलदार श्री.सतिष यांना असे म्हणाले की, अरे बाप रे पहीलेच ले कर्ज हे महयावर, पहीलेच कर्ज बाजारी आहे मी, दहा दहा रुपये जमा करतो, त्यावर लोकसेवक श्री.सतिष तक्रारदार यांना म्हणाले की, बरोबर आहे म्हणुनच म्हटलं. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.सतिष यांना म्हटले की, तुम्ही करा न आता ते जास्त होता न, आपण भले पाहुन घेवु नंतर, त्यावर लोकसेवक श्री.सतिष हे लाच रकमेसंदर्भात म्हणाले की, मी काय सांगु मग, सांग बर मजजवळ टाईम नाही, तुझं झालं की पाठुन दे, त्यावर तक्रारदार म्हणाले की, कमी करा नं, काही थोडे कमी करा नं, असे म्हटले असता लोकसेवक श्री.सतिष म्हणाले की, शक्यच नाही. घेवुन यायचं असेल तर आताच घेवुन ये, त्यावर तक्रारदार हे लोकसेवक श्री.सतिष यांना म्हणाले की, मी घरी फोन करु का अरेंजमेट कराव लागन साहेब, त्यावर लोकसेवक श्री. सतिष म्हणाले की, घेवुन ये आता ताबडतोब, थोडया वेळानंतर लोकसेवक श्री.सतिष हे तक्रारदार यांना म्हणाले की, लास्ट चान्स ये, पेपर घेवुन ये असे म्हणुन एका कागदावर पुन्हा 25000/- रुपये अंकामध्ये लिहुन तक्रारदार यांना दाखविले. त्यावर तक्रारदार म्हणाले की, तेवढी कॅपेसीटी नाही ये, कारण काय भो मह नुकसान झालयं आणि एवढे पैसे पण नाही हे, त्यावर लोकसेवक श्री.सतिष म्हणाले की, किती देवु शकतो मग? त्यावर तक्रारदार म्हणाले की, तुम्ही पंचवीस म्हणताय, पंचवीस पण जास्त म्हणजे जास्त होताय, त्यावर लोकसेवक श्री.सतिष म्हणाले की, ते मी सांगीतले....साहेबांना विचारुन घेतो, नंतर तु सांग ना, एक्दा सांगीतल्याशिवाय कस कळेल, किती करु शकतो आता तु? त्यावर तक्रारदार यांनी म्हटले की, मला घरच्यांना विचारावे लागेल, कारण मी आता पुर्ण खाली असल्यामुळे फोन करुन बोलवावे लागेल पैसे, आता मला तुम्ही सांगीतलं पण नाही, अन माणुस सोबत थोडी आणतं एवढे नोट पैसे, आपले माणुस समजुन करा आता तुम्हाले त माहीत आहे आपण रोल मध्ये पण नव्हतो, कशात नव्हतो तेच्यात नुकसान झालंय माझं एकटयाचं झालय, असे म्हटले असता लोकसेवक श्री.सतिष तक्रारदार यांना म्हणाले की, किती करतो शेवटचं सांग, मी साहेबांना भेटतो मंग, त्यावर तक्रारदार यांनी घरी फोन करुन विचारुन घेतो असे सांगुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.सतिष यांचेसमक्ष घरी फोन करुन त्यांचे आईला विचारले की, आई पैसे आहे का व तुयाजं ते साहेब पंचवीस हजार रुपये मांगताहे हा... हा... हाये का होईल का अॅडजस्ट पाह नाही त कोणाकडुन अॅडजस्ट कर ना .... पाह ना अॅडजस्ट कर ना ते साहेब म्हणतात आज लागीनच बाॅ ... बोल ना ... पाह कर ना अॅडजस्ट काही तरी कर ना मले फोन पे टाक ना महया नंबरवर ....ठि हे लावतो मी तुले ठेव असे म्हणुन आईसोबत बोलणी केली. त्यानंतर पुन्हा लोकसेवक श्री.सतिष तक्रारदार यांना म्हणाले की, अरे ते नाही म्हणत नी तुझजवळ पैसे नाहीत कि नी, तु सांग किती पर्यंत देवु शकतो, साहेबाले सांगतो मी, तु किती पर्यत देवु शकतो ते त सांग, त्यावर तक्रारदार म्हणाले की, करुन देवु शकतो न मी दहा एक पर्यंत, दहा एक पर्यंत करुन देईल, त्यावर लोकसेवक श्री.सतिष म्हणाले की, किती वेळ लागु शकतो, त्यावर तक्रारदार म्हणाले की, मला अर्धा तास द्या, मी तुम्हाला अर्ध्या तासात पैसे आणुन देतो, त्यावर लोकसेवक श्री.सतिष म्हणाले की, आजचा दिवस साहेबाले बोलुन घेतो असे म्हटले असता तक्रारदार यांनी, हा बोलुन घ्या नं, येवु का मग? असे म्हटले. यावरुन पोलीस कर्मचारी श्री.सतिष यांनी तक्रारदार यांना पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड हद्दीत दिनांक 17.09.2025 रोजी झालेल्या अपघातासंबंधाने गाडी मालक या नात्याने तक्रारदार श्री.विजय ठाकुर यांचेवर गुन्हा दाखल न करण्याचा मोबदला म्हणुन 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 10,000/- रुपये (दहा हजार रुपये) लाच रक्कम स्विकारण्यास संमती दर्शविली. त्यानुसार दिनांक 06.10.2025 रोजी पोलीस स्टेशन

एमआयडीसी दसरखेड येथे पोलीस अंमलदार श्री.सतिश यांचेविरुध्द सापळा कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक पोलीस अंमलदार श्री.सतीष यांना तक्रारदार श्री.विजय ठाकुर यांचे हालचालीवर संशय आल्याने त्यांचेकडुन लाच रक्कम स्विकारली नाही. त्यानंतर एमआयडीसी दसरखेड येथील पोलीस अंमलदार श्री.सतिष यांनी तक्रारदार यांना मागील दोन दिवसापासुन कोणत्याही प्रकारे संपर्क केला नसुन तक्रारदार यांचे हालचालीवर संशय आल्याने ते आता तक्रारदार श्री.विजय ठाकुर यांच्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची त्यांना खात्री झाली आहे. याबाबत दिनांक 08.10.2025 रोजी तक्रारदार श्री.विजय ठाकुर यांनी लाप्रवि कार्यालयात हजर येवुन दिलेल्या जबाबानुसार पंचनामा तयार करण्यात आला आहे.
तरी दिनांक 27.09.2025 रोजीचे 14.48 वा.ते 16.22 वा दरम्यान आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड, मलकापुर येथे पोलीस अंमलदार श्री.सतिष वैदकर यांनी तक्रारदार श्री. विजय ठाकुर यांना दिनांक 17.09.2025 रोजी झालेल्या अपघातासंबंधाने गाडी मालक या नात्याने त्यांचेवर गुन्हा दाखल न करण्याचा मोबदला म्हणुन गैरलाभ मिळविण्याच्या उद्देशाने 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्यास संमती दर्शविली. त्यावरुन आरोपी लोकसेवक श्री. सतिष रतन वैदकर, वय 40 वर्षे, पद-पोलीस हेडकाॅन्स्टेबल, ब.नं.1820, पोलीस स्टेशन एमआयडीसी दसरखेड, मलकापुर जि.बुलढाणा यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचेविरुध्द सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

सही,

(भागोजी चोरमले), पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्श्न ब्युरो, बुलढाणा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

HEMRAJ BHAGWAN KOLI(I (Inspector)) / 8401DCPS **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):
दि. 10/10/2025 चे 10/30 वा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): HEMRAJ BHAGWAN I
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 8401DCPS

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)